दुसरी/आवृत्ती-२

सत्यमेव जयते

# मतदान केंद्राध्यक्षांसाठी तपासणी सूची
# २०२३

## भारत निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

“ निवडणुका सर्वसमावेशक, सुलभ, सहभागात्मक,
सुरक्षित आणि प्रलोभनमुक्त करणे ”

# मतदान केंद्राध्यक्षांसाठी तपासणी सूची

# २०२३

## भारत निवडणूक आयोग

वाय १७८५—१

# मतदान केंद्राध्यक्षांसाठी तपासणी सूची

| बाबी<br>(१) | करावयाची कार्यवाही<br>(२) | | मतदान केंद्राध्यक्षासाठी निदेशपुस्तकाचे संदर्भ<br>(३) |
|---|---|---|---|
| **(क)** | **मतदान केंद्राध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्यावर** | | |
| १. | कृपया खालील प्रशिक्षण साहित्य व अनुदेश वाचावे ... ... | ... | ... |
| | (क) मतदान केंद्राध्यक्षासाठीचे निदेशपुस्तक ; | | |
| | (ख) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (ईव्हीएम) व मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी (व्हीव्हीपीएटी) नियमपुस्तिका ; | | |
| | (ग) मतदान केंद्राध्यक्षांना महत्त्वाचे अनुदेश देणारे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे पत्र, कोणतेही असल्यास. | | |
| २. | आपण मतदान प्रक्रिया, कार्यपद्धती, कर्तव्ये यासंबंधातील प्रशिक्षण आणि ईव्हीएम/व्हीव्हीपीएटीचे प्रत्यक्ष प्रशिक्षण घेतले आहे याची सुनिश्चिती करा. | ... | १.४, १.७, ३.१ |
| ३. | कृपया मतदान केंद्राध्यक्षांच्या निदेशपुस्तिकेमध्ये देण्यात आलेले निरनिराळे सांविधिक व असांविधिक नमुने काळजीपूर्वक वाचावेत. | | ... |
| ४. | योग्य वेळेत टपाली मतपत्रिका/निवडणूक कार्य प्रमाणपत्र (ईडीसी) यासाठी अर्ज करा. | ... | १.५ |
| ५. | कृपया टपाली मतपत्रिकेचा विकल्प निवडण्याच्यावेळी सुविधा केंद्रांवरील 'मत पेटीत' (बॅलेट बॉक्स) टपाली मतपत्रिका जमा केल्याचे आणि आपली निवडणूक कार्य प्रमाणपत्रे, लागू असल्यास व आधी त्यासाठी अर्ज केला असल्यास, प्राप्त केल्याचे सुनिश्चित करावे. | | १.५ |
| **(ख)** | **जावक केंद्रावरील प्रशिक्षण** | | |
| १. | कृपया नियुक्तीपत्र, विधानसभा मतदार संघ/(संसदीय मतदार संघ असल्यास) भागाचे नाव, मतदान केंद्राचे नाव व क्रमांक आणि मतदान केंद्राचे ठिकाण काळजीपूर्वक तपासून घ्या. | | ... |
| २. | आपण मतदान पथकातील सुरक्षा कर्मचाऱ्यांसहीत सर्व सदस्यांशी परिचित व्हावे | ... | ... |
| ३. | जर एखादा सदस्य (काही सदस्य) अनुपस्थित असतील, तर कृपया राखीव कर्मचाऱ्यांमधून बदली सदस्य मिळण्याची खात्री करा. | | ... |
| ४. | जीपीएस सक्षम निर्देशित वाहनामधून पूर्व निर्धारित मार्गाने मतदान केंद्रावर जाण्यासाठी मार्गदर्शन व मदतीसाठी विभाग/क्षेत्रीय अधिकाऱ्याशी कृपया संपर्क साधावा. | | ... |
| ५. | कृपया आपणास देण्यात आलेल्या सूचीनुसार सर्व मतदान साहित्य आपण घेतले असल्याची सुनिश्चिती करा. | | ... |
| ६. | (ए) कृपया आपण, आपल्याला (नेमून दिलेल्या) मतदान केंद्राशी संबंधित नियंत्रण युनिट, मतदान युनिट व व्हीव्हीपीएटी ताब्यात घेतलेले आहेत याची खात्री करा. | | ... |
| | (बी) प्रत्येक युनिटच्या मागच्या बाजूच्या मेटालिक प्लेट/बारकोडशी ॲड्रेस टॅगवर लिहिलेला युनिट आयडी जुळवून पहावा. | ... | १.७ |

**मतदान केंद्राध्यक्षांसाठी तपासणी सूची—**चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ७. | कृपया नियंत्रण युनिटच्या 'उमेदवार संचाचा भाग' आणि 'अर्जाच्या संचिकेचा भाग' योग्यरीत्या मोहोरबंद केलेली आहेत आणि त्यावर पत्ता खूणचिठ्ठी (ॲड्रेस टॅग) घट्ट लावलेली असल्याचे तपासून पहा. | १.७.दोन |
| ८. | कृपया नियंत्रण युनिटमधील बॅटरी पूर्णपणे कार्यक्षम आहे काय हे नियंत्रण युनिटचे (CU) चे बटण 'ON' (सुरू) करून खात्री करा. तपासून झाल्यानंतर नियंत्रण युनिट बंद '(स्वीच OFF)' करावे. | १.७.तीन |
| ९. | कृपया मतदान युनिट (युनिटे) यथोरित्या मोहोरबंद केलेली आहेत आणि त्याच्या दोन्ही बाजूस वर व खाली, उजव्या बाजूस खूणचिठ्ठी (ॲड्रेस टॅग) घट्टपणे लावलेले आहेत याची खात्री करावी. | १.७.दहा |
| १०. | कृपया प्रत्येक मतदान युनिटवर योग्य ती मतपत्रिका लावलेली आहे आणि ती मतपत्रिकेच्या स्क्रिनखाली तंतोतंत व्यवस्थित लावली आहे याची खात्री करावी. | १.७.पाच |
| ११. | प्रत्येक मतदान युनिटमध्ये थम्ब व्हिल स्वीच योग्य स्थितीत ठेवलेला आहे हे तपासा, जर काही विसंगती असल्यास, क्षेत्रीय अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळवा. | १.७.सहा |
| १२. | मतदान युनिटवरील (युनिटांवरील) दिसणारी उमेदवारांच्या नावासमोरील न झाकलेली बटणे (unmasked) उमेदवारांच्या संख्येएवढी आहेत का (नोटा पर्यायासह आणि न वापरावयाची उर्वरित बटणे झाकून ठेवण्यात आली आहेत का हे तपासून पहा. | १.७.नऊ |
| १३. | व्हीव्हीपीएटी च्या प्रवासा दरम्यान पेपर रोल बंदिस्त (लॉक) राहण्यासाठी, मागच्या बाजूस असलेला नॉब, बंद (लॉक) स्थितीत (प्रवासात/आडव्या स्थितीत) आहे हे कृपया तपासा. | ... |
| १४. | मतदान पथकातील सदस्यांना, साहित्य वाटपाच्यावेळी आणि कोणत्याही परिस्थितीत मतदान केंद्रावर केल्या जाणाऱ्या अभिरुप मतदानापूर्वी व्हीव्हीपीएटीची तपासणी करू नये. (NOT TO TEST VVPAT) अशी सूचना द्यावी. | १.७.चार |
| १५. | आपणास प्राप्त झालेल्या सर्व प्रकारच्या कागदी मुद्रांचे अनुक्रमांक तपासून पहा ... | १.६ |
| १६. | पुढील बाबतीत खात्री करून घेण्याच्या दृष्टीने, मतदार याद्यांची तपासणी करा :— | |
| | १. आपणास मतदार यादीची चिन्हांकित प्रत मिळाली आहे. ... | ... |
| | २. मतदार याद्यांच्या कार्यप्रतींचे (working copies) पृष्ठ क्रमांक अनुक्रमांकानुसार आले आहेत का ? ... | १.९ |
| | ३. मतदाराच्या छापील अनुक्रमांकात दुरुस्ती करण्यात आलेली नाही आणि नवीन क्रमांक दाखल करण्यात आलेले नाहीत. | ... |
| १७. | आपल्याला, अनुपस्थित, स्थलांतरित व मृतांची (ए.एस.डी सूची) सूची मिळाल्याची खात्री करावी. | ४.३.३ |
| १८. | त्याच विधानसभा मतदार संघासाठीच्या प्रदत्त मत पत्रिका मिळाल्या असल्याची खात्री करा. ... | ५.६.२ |
| १९. | निवडणूक लढवणारे उमेदवार आणि त्यांच्या मतदार प्रतिनिधी यांच्या नमुना सह्यांची छायाप्रती आपण घेतल्या आहेत याची तपासणी करा. | १.८.(बारा) |

**मतदान केंद्राध्यक्षांसाठी तपासणी सूची**—चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| **(ग)** | **मतदान केंद्रावर आल्यावर** | |
| १. | मतदारांना मतदान केंद्राबाहेर प्रतीक्षा करण्यासाठी आणि पुरुष महिला आणि दिव्यांग/वरिष्ठ नागरीक मतदारांसाठी स्वतंत्र रांगा लावण्यासाठी पुरेशी जागा आहे याची खात्री करावी. | २.३ |
| २. | जर एखाद्या मतदान केंद्रात पुरेशा संख्येने मोठ्या प्रमाणात महिला मतदार असतील तर, गोपनीयता/प्रतिष्ठा व सभ्यता या गोष्टी विचारात घेऊन त्यांची ओळख पटविण्याकरिता एका स्वतंत्र जागेत आणि पक्की शाई लावण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात यावी. | २.६ |
| ३. | मतदारांना आत येण्यासाठी आणि बाहेर जाण्यासाठी स्वतंत्र मार्ग असावेत. मतदान केंद्र असलेल्या, खोलीला एकच दरवाजा असला तरी, बांबू व दोरखंडाच्या साहाय्याने दरवाजाची विभागणी करून आत शिरण्याची आणि बाहेर पडण्यासाठी स्वतंत्र मार्ग पुरविण्यात येतील. | २.३ |
| ४. | जर एकाच इमारतीत एकापेक्षा जास्त मतदान केंद्र असतील तर, प्रत्येक मतदान केंद्राचे मतदार वेगवेगळे करावे आणि प्रत्येक मतदाराला आपआपल्या केंद्रांसमोर वेगवेगळ्या जागेत प्रतिक्षा करण्यासाठी रांगेत उभे राहताना कोणताही गोंधळ होणार नाही याची खात्री करावी. | २.६ |
| ५. | कोणत्याही राजकीय पक्षाचे, कोणत्याही नेत्याची छायाचित्र किंवा चिन्हे किंवा निवडणुकीशी संबंधित घोषणा मतदान केंद्रात दिसणारे असल्यास, काढून टाकणे किंवा पूर्णपणे झाकावे. | २.६ |
| ६. | मतदान केंद्राभोवतीची २०० आणि १०० मीटरची परीघसीमा माहित करून घ्यावी आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दल/राज्य पोलीस कर्मचारी/गृहरक्षक तिथे तैनात असल्याची खातरजमा करून सुरक्षेची खात्री करून घ्यावी. १०० मीटर इतक्या परीघातील क्षेत्र हे आपल्या नियंत्रणाखाली घ्यावे आणि राजकीय पक्षांच्या व उमेदवारांची प्रचार पत्रके काढून टाकावीत. आपल्या मतदान केंद्राच्या २०० मीटरच्या आत कोणत्याही राजकीय पक्ष कार्यकर्त्यास (सदस्यांस) बसू देऊ नये. | ४.१ |
| ७. | मतदान केंद्राच्या आत स्वयंपाकाची किंवा कोणत्याही प्रयोजनार्थ विस्तव पेटविण्याची परवानगी देऊ नये | २.६ |
| **(घ)** | **मतदान केंद्रामधील व्यवस्था** | |
| १. | व्हीव्हीपीएटी यंत्राच्या थेटवर किंवा समोर उच्चदाबाचा प्रखर दिवा/ट्युबलाईट बसवू नये आणि मतदान यंत्र (ईव्हीएम) व व्हीव्हीपीएटीच्या मागे कोणतीही खिडकी उघडी नसावी. | २.३ |
| २. | मतदान युनिट आणि व्हीव्हीपीएटी मतदान कक्षात टेबलावर ठेवावीत. व्हीव्हीपीएटी पहिल्या मतदान युनिटाच्या डाव्या बाजूस ठेवावे. | ३.२.१ |
| ३. | नियंत्रण युनिट (सीयु), मतदान युनिट (बियु) आणि व्हीव्हीपीएटी वायरीने जोडा. (बियु-व्हीव्हीपीएटी-सीयु) | ३.२.१ |
| ४. | मतदान कक्षात ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपीएटी अशा पद्धतीने ठेवावेत की, जेणे करून त्या वायरीचा कोणालाही अडथळा होणार नाही आणि ती वायर स्पष्टपणे दिसेल, मतदान केंद्रातील मतदारांची ये-जा होत असताना त्यांच्या पायाखाली वायर येऊन त्यांना अडथळा ठरणार नाही, अशा प्रकारे ठेवण्यात यावी. | २.३ |

**मतदान केंद्राध्यक्षांसाठी तपासणी सूची—**चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ५. | (अ) जोडणी केबल ही, मतदान कक्षाच्या मागील भागाच्या तळाशी असलेल्या छिद्रातून मतदान युनिटला जोडली असल्याची खात्री करा. | ... |
| | (ब) मतदान युनिट आणि व्हीव्हीपीएटीची जोडणी वायर टेबलाच्या पायाला दीड इंचाच्या **"पारदर्शक चिकट पट्टीने"** अशा पद्धतीने चिकटवावे की वायर्स हवेत लटकणार नाहीत जेणे करून लटकणाऱ्या वायरींच्या वजनाने मतदान युनिट आणि व्हीव्हीपीएटीच्या जोडणाऱ्या कळीवर (स्विचवर) परिणाम होणार नाही (ते हलणार नाही). | २.३ |
| ६. | मतदानाची गुप्तता राखण्यासाठी, मतदान कक्ष मतदान केंद्राच्या खिडकी किंवा दरवाज्याच्याजवळ असणार नाही किंवा वेब कॅमेरा/व्हिडीओ कॅमेऱ्याच्या चित्रीकरणाच्या टप्प्यात येत नसल्याची खात्री करा. | २.३ |
| ७. | नियंत्रण युनिट (सीयु) चालू (on) करण्याच्या आधी व्हीव्हीपीएटी पेपर रोलची बंद चालू कळ, (lock-unlock switch) चालू-उभ्या (working-vertical) स्थितित ठेवा. | ३.२.१ |
| ८. | नियंत्रण युनिटची योग्य प्रकारे जोडणी झाल्यावर आणि ते योग्य ठिकाणी ठेवल्यानंतरच नियंत्रण युनिटची पॉवर कळ (स्विच) चालू करा. | ... |
| ९. | मतदान अधिकारी आणि प्रतिनिधी यांची बसण्याची व्यवस्था अशा पद्धतीने करण्यात यावी की, मतदान युनिट, व्हिव्हीपीएटी आणि मतदान युनिट वरील बटण दाबून आपले मत नोंदवणारा मतदार त्यांना प्रत्यक्ष दिसणार नाही. | २.३ |
| १०. | मतदान प्रतिनिधिंना अशा पद्धतीने बसवावे की, जेणेकरून मतदान केंद्रात शिरणाऱ्या मतदाराचा (तो/ती) चेहरा त्यांना स्पष्ट दिसेल आणि गरज पडल्यास त्यांना त्यांच्या ओळखीला (identity) आव्हान देता येईल. | २.१४ |
| ११. | मतदान केंद्रावरील उमेदवारांच्या मतदार प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था पुढील प्राथम्यक्रमाने असावी :<br>(क) मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्षांचे उमेदवार.<br>(ख) मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्षांचे उमेदवार.<br>(ग) इतर राज्यातील मान्यताप्राप्त उमेदवार, ज्यांना मतदारसंघात त्यांच्या राखीव निवडणूक चिन्हाचा वापर करण्याची परवानगी देण्यात आली आहे.<br>(घ) नोंदणीकृत मात्र मान्यता न मिळालेल्या पक्षांचे उमेदवार.<br>(ङ) अपक्ष उमेदवार. | २.१४ |
| १२. | मतदान प्रतिनिधींच्या नियुक्तीपत्राची तपासणी करावी आणि त्यांना लोक प्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२८ च्या तरतुदी समजावून सांगाव्यात. ये-जा करण्याकरिता त्यांना प्रवेशपत्र द्यावीत. | २.११<br>२.१३ |
| १३. | मतदान केंद्रात नियुक्ती करण्यात आलेल्या मतदान प्रतिनिधींकडे मतदार छायाचित्र ओळखपत्र (ईपीआयसी) किंवा शासनाने मान्यता दिलेली इतर कोणतेही ओळखपत्र असल्याची खात्री करा. | २.१० |

**मतदान केंद्राध्यक्षांसाठी तपासणी सूची**—चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| १४. | खालील बाबींची खात्री करा : | २.७ |
| | (एक) मतदान केंद्राचे, मतदान क्षेत्र व त्या मतदान केंद्रात मतदान करण्याऱ्या मतदारांचा तपशील विनिर्दिष्ट करणारी नोटीस केंद्राबाहेर दर्शनी भागात लावली आहे का ? | |
| | (दोन) नमुना ७ए मधील निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या यादीची एक प्रत, प्रामुख्याने प्रत्येक मतदान केंद्राच्या बाहेर प्रदर्शित करण्यात यावी. | |
| | (तीन) मतदार सुविधा पत्रके (मतदारांना मतदानाबाबतची माहिती देणारी) प्रत्येक मतदान केंद्राच्या दरवाज्याजवळील बाहेरच्या भिंतीवर प्रदर्शित करावीत. | |
| १५. | मतदार यादीमधील मतदारांची नावे शोधण्याची सुविधा पुरविण्यासाठी 'मतदार मदत केंद्र' उभारावे. | १.१५ |
| **(ई)** | **अभिरूप मतदान** | |
| १. | मतदान कक्षावर चिटकवण्याची व्यवस्था असलेले स्टिकर्स लावून त्याची योग्य व्यवस्था करण्यात यावी, जेणेकरून निवडणूक विषयक माहिती स्पष्टपणे दिसून येईल. | १.१२ |
| २. | सूक्ष्म निरीक्षक, नियुक्त केला असल्यास, त्याने अभिरूप मतदानाच्या प्रक्रियेमध्ये सहभाग घेतलेला असला पाहिजे आणि मतदान केंद्राध्यक्षांच्या अहवालावर (अभिरूप मतदान प्रमाणपत्र) भाग-१ वरती त्यांची सही घेतलेली असावी. | २.२० |
| ३. | जर निदेश देण्यात आले असतील तर, अभिरूप मतदान प्रक्रिया व्हीडीओ/ध्वनीचित्ररूपीत करण्यात यावी. | २.१७ |
| ४. | अभिरूप मतदानाकरिता, मतदान कक्षामध्ये मतदान युनिट आणि व्हीव्हीपीएटी ठेवले जावे, जेथे मतदान युनिटवरील कार्यवाहीचे आणि व्हीव्हीपीएटीवरील मुद्रित कागदी चिठ्ठ्यांचे निरीक्षण करण्यासाठी मतदान प्रतिनिधींसह मतदान अधिकारी उपस्थित असतील. हस्तचलित देण्यात आलेल्या मतांची नोंद मतदान अधिकारी (PO) नोंदवेल. | ३.२.१ |
| ५. | जर किमान २ मतदान प्रतिनिधी उपस्थित असले तर, प्रत्यक्ष मतदान सुरू होण्याच्या ९० मिनिटा आधी अभिरूप मतदान घेण्यात यावे, अन्यथा १५ मिनिटे प्रतिक्षा करावी आणि कुणीही नसले किंवा एक मतदान प्रतिनिधी उपस्थित असला तरी अभिरूप मतदान सुरू करावे. | ३.३.२ |
| ६. | अभिरूप मतदानाच्या शेवटी, नियंत्रण युनिटच्या निकाल (रिझल्ट) विभागातील बंद (क्लोज) बटण दाबावे. त्यानंतर, अभिरूप मतदान निकालाची खात्री करण्यासाठी, नियंत्रण युनिटच्या निकाल भागातील निकाल (रिझल्ट) म्हणून चिन्हांकित केलेले बटण दाबावे. | ३.३.५ (तीन) |
| ७. | मतदार प्रतिनिधींच्या उपस्थितीत व्हीव्हीपीएटीच्या कागदी चिठ्ठ्यांची मोजणी करावी आणि त्याचा प्रत्येक उमेदवाराच्या निकालाशी मेळ बसत असल्याची पुष्टी करावी. | ३.३.५ |
| ८. | अभिरूप मतदानादरम्यान नोंदविलेली मते निःशेष (साफ) करण्यासाठी निःशेष (क्लिअर) बटण दाबा. | ३.३.४ |
| ९. | मतदान प्रतिनिधींद्वारे रिकाम्या ड्रॉप बॉक्सची (drop box) पडताळणी करण्यात यावी. | ३.३.४ |

**मतदान केंद्राध्यक्षांसाठी तपासणी सूची–**चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| १०. | अभिरूप मतदानातील व्हीव्हीपीएटी कागदी चिठ्ठ्यांच्या मागील बाजूला रबरी ' MOCK POLL SLIP ' (अभिरूप मतदान चिठ्ठी) असे कोरलेला ठसा उमटवावा. | ३.३.५ (चार) |
| ११. | अभिरूप मतदानाच्या कागदी चिठ्ठ्या मोहोरबंद करण्यासाठीच्या काळ्या पाकिटावर मतदान प्रतिनिधींच्या सह्या घेऊन त्यावर मतदान केंद्राचा क्रमांक व नाव आणि विधानसभा मतदारसंघाचा क्रमांक व नाव, मतदानाचा दिनांक व अभिरूप मतदानाच्या व्हीव्हीपीएटी कागदी चिठ्ठ्या असे लिहावे. | ३.३.५ (चार) |
| १२. | लिफाफा गुलाबी कागदी मोहोर लावून तो अशा रीतीने मोहोरबंद करण्यात यावा की पेटी उघडताना त्याची मोहोर तोडणे भाग पडेल. | ३.३.५ (चार) |
| १३. | आपली आणि मतदान प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या गुलाबी कागदी चिठ्ठीवर घेतल्या आहेत आणि पेटीत निवडणुकींशी संबंधित इतर कागदपत्रांबरोबर ठेवला आहे याची खात्री करावी. | ३.३.५ (चार) |
| १४. | प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्षाच्या मोहोरेचा वापर करून, दोरा आणि पत्ता खूण चिठ्ठीसह व्हीव्हीपीएटीचा ड्रॉप बॉक्स, मोहोरबंद करा. | ३.४.१ |
| १५. | नियंत्रण युनिटाचा रिझल्ट हिरव्या कागदी मोहोर विशेष खूणचिठ्ठी व पत्ता खूणचिठ्ठी मोहोरबंद करून त्यावर मतदान प्रतिनिधींची सही घ्यावी. | ३.४.१ |
| १६. | मतदान केंद्राध्यक्षाच्या अहवालाचा भाग-१ (अभिरूप मतदान प्रमाणपत्र) तयार करा. | ३.३.५ |
| १७. | अभिरूप मतदान संपल्यानंतर त्याच्या प्रमाणपत्रावर, मतदान प्रतिनिधींची आणि उमेदवारांची आणि ज्यांचे प्रतिनिधीत्व करीत आहेत अशा पक्षाची नावे नमूद केल्याची आणि त्यावर त्यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्याची खात्री करावी. | ३.३.५ |
| १८. | मतदान केद्राध्यक्षाचा अहवाल भाग-१ मध्ये, प्रत्यक्ष मतदान चालू व्हायच्या आधी अभिरूप मतदानाची मते नियंत्रण युनिटमधून पुसली गेलेली आहेत आणि व्हीव्हीपीएटी मधून प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी अभिरूप मतदानाच्या व्हीव्हीपीएटी चिठ्ठ्या काढून टाकलेल्या आहेत अशी दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याची साक्ष घ्या. | ३.३.५ |
| १९. | मतदान केंद्रावर अभिरूप मतदानाच्या शेवटी, नियंत्रण युनिटच्या दर्शनीपटलावर दाखवलेला दिनांक आणि वेळ आणि त्याचबरोबर प्रत्यक्ष त्या दिवशीचा दिनांक आणि वेळ यांची नोंद घ्या, तसेच या दोहोंमध्ये काही विसंगती, कोणतीही असल्यास यांचीही नोंद घ्या आणि त्याची अभिरूप मतदान प्रमाणपत्रात आणि मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीत नोंद ठेवा. | ३.३.५ |
| २०. | आपल्या क्षेत्रीय अधिकाऱ्यामार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला अभिरूप मतदानाची स्थिती सूचित करावी. | १.१४ |
| **(एफ)** | **मतदानास प्रारंभ** | |
| १. | नियोजित वेळेत मतदान सुरू होईल याची खात्री करावी. | ४.२ |
| २. | सर्व उपस्थितांना मताची गुप्तता राखण्याच्या त्यांच्या कर्तव्याच्या संबंधातील लोक प्रतिनधित्व अधिनियम, १९५१. च्या कलम १२८ च्या तरतुदी समजावून सांगाव्यात आणि त्याच्या कोणत्याही उल्लंघनाकरिता आलेल्या शास्तीबाबत त्यांना सूचना देण्यात याव्यात. | ४.२ |

**मतदान केंद्राध्यक्षांसाठी तपासणी सूची**—चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ३. | अनुदेशानुसार प्रतिज्ञापन वाचून दाखवावे (परिशिष्ट-६) ... ... ... | ४.२ |
| ४. | आयोगाने निर्दिष्ट केल्यानुसार 'भेट-नोंद' (visit sheet) राखावे. ... ... | २.१९ |
| ५. | आपल्या क्षेत्रीय अधिकाऱ्याच्या मार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला मतदानाच्या प्रारंभाची स्थिती सूचित करावी. | १.१४ |
| ६. | नमुना १७ए (मतदार नोंदवही) मध्ये पहिल्या मतदाराची सही होण्यापूर्वी, मतदान अधिकारी-१ मतदान केंद्राध्यक्षासह (नियंत्रण युनिट) तपासून पाहिल आणि "नियंत्रण युनिट मधील एकूण तपासली आणि ती शून्य आढळून आली" असे लेखी नमुना १७क मध्ये नोंदवेल. | ९.२७ |
| **(जी)** | **अभिरूप मतदान/प्रत्यक्ष मतदानादरम्यान ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (ईव्हीएम) बदलणे :** | |
| | अभिरूप मतदान/प्रत्यक्ष मतदानादरम्यान ईव्हीएमची बदली करण्यासाठी पुढील नियमप्रक्रिया अनुसरावी : | |
| | (क) अभिरूप मतदानाच्या दरम्यान ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची (ईव्हीएमची) पुनःस्थापना—केवळ संबंधित युनिट बदलले जाईल.<br>• जर मतदान युनिट अकार्यक्षम असेल तर—केवळ मतदान युनिट बदलावे.<br>• जर नियंत्रण युनिट अकार्यक्षम असेल—तर केवळ नियंत्रण युनिट बदलावे<br>• जर व्हीटी अकार्यक्षम आहे—तर केवळ व्हीटी बदलावे. | |
| | (ख) प्रत्यक्ष मतदानाच्या दरम्यान ईव्हीएम बदलणे :<br>• जर मतदान युनिट किंवा नियंत्रण युनिट अकार्यक्षम असेल, तर संपूर्ण संच (मतदान युनिट + नियंत्रण युनिट + व्हीटी) बदलवा आणि 'नोटा' सहित प्रत्येक उमेदवाराला अभिरूप मतदानामध्ये केवळ एकच मत दिले जात आहे याची खात्री करावी. अभिरूप मतदानाची सर्व प्रक्रिया अनुसरावी.<br>• जर व्हीव्हीपीएटी अकार्यक्षम असेल, तर केवळ व्हीव्हीपीएटी बदलावे. अशावेळी अभिरूप मतदानाची आवश्यकता नाही. | ४.६.१ |
| (सी) | कोणत्याही युनिटाची केवळ ऊर्जा संचिका (पॉवर पॅक) बदलायची असेल तर अभिरूप मतदानाची आवश्यकता नाही. जर प्रत्यक्ष मतदानादरम्यान संपूर्ण संच बदलण्यात आल्यास, वर उल्लेखिलेली अभिरूप मतदानाची सर्व प्रक्रिया काटेकोरपणे अनुसरली जाईल याची खात्री करावी. | |
| २. | जर अभिरूप मतदान/प्रत्यक्ष मतदानादरम्यान/मतदान समाप्तीनंतर नियंत्रण युनिटाची ऊर्जा संचिका (पॉवर पॅक) बदलण्यात असल्यास, मतदान केंद्राध्यक्षांच्या अहवालातील भाग-दोन (परिशिष्ट-५) भरावे. | ४.६.१ |
| ३. | जर अभिरूप मतदानाच्या दरम्यान ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी बदलण्यात आले असेल तर परिशिष्ट-५ चा भाग-चार भरावा. | ४.६.२ |
| ४. | जर प्रत्यक्ष मतदानाच्या दरम्यान ईव्हीएम/आणि/किंवा व्हीव्हीपीएटी बदलण्यात आल्यास मतदान केंद्राध्यक्षाच्या अहवालातील भाग चार भरावा. | ४.६.२ |

**मतदान केंद्राध्यक्षांसाठी तपासणी सूची—**चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ५. | ईव्हीएमची बदलणे इ. यांसारखी महत्त्वपूर्ण माहिती क्षेत्रीय अधिकाऱ्याच्या मार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास पुरवावी. मतदान केंद्राध्यक्षाच्या अहवालातील भाग-चार व भाग पाच क्षेत्रीय अधिकाऱ्याकडे सुपूर्द करावा. | ४.६.३ |
| **(एच)** | **मतदानादरम्यान घ्यावयाची सावधगिरी** | |
| १. | मतदान केंद्रात शस्त्र बाळगता येणार नाही ... ... ... | २.२.२ |
| २. | मतदान केंद्राच्या आत धूम्रपान करण्यास कोणालाही परवानगी देण्यात येणार नाही. ... | २.१५ |
| ३. | मतदान प्रक्रिया सुरू असताना, मतदारांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवावे आणि दोन्ही किंवा दोन्हीपैकी एका निवडणुकीत मतदार मतदान न करता निघून जाऊ नये याची खात्री करावी. | १.१२ |
| ४. | मतदारांच्या अनुक्रमांकानुसार मतदान होत आहे. याची खात्री करण्यासाठी ठराविक वेळाने नियंत्रण युनिटवरील 'टोटल' हे बटण दाबून प्रत्येक नियंत्रण युनिटची एकूण बेरीज (टोटल) तपासावी. | १.१२ |
| | [ एकूण बेरीज (टोटल) मतदार नोंदवहीशी म्हणजे नमुना १७ए चा शेवटचा अनुक्रमांकाशी जुळली पाहिजे ]. | ४.५.४ |
| ५. | मतदार कोणत्याही प्रकारे यंत्रांशी छेडछाड करत नसल्याची खात्री करण्यासाठी नियमित अंतराने, मतदान युनिटे आणि व्हीव्हीपीएटी यांची तपासणी करावी. | १.१२ |
| ६. | पहिल्या मतदान अधिकाऱ्याद्वारे (मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीचा प्रभारी) मतदाराची ओळख पटवून झाल्यानंतर योग्यरीत्या पक्की शाई लावण्यात आल्याची खात्री करावी. | ४.४ |
| ७. | मतदार आणि भारताच्या निवडणूक आयोगाद्वारे अनुमती असलेले प्राधिकारी, यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणतीही व्यक्ती, मतदान केंद्रामध्ये प्रवेश करणार नाही याची खात्री करावी. | २.८ |
| ८. | मतदार केंद्रामध्ये कोणताही मतदार भ्रमणध्वनी आणणार नाही याची खात्री करावी आणि मतदान केंद्रामध्ये निवडणूक कर्मचाऱ्यांचे भ्रमणध्वनी देखील बंद ठेवण्यात येतील. | ४.१ |
| ९. | अनुपस्थित, स्थलांतरित व मृत यादीमध्ये ज्यांच्या नावाचा समावेश आहे, अशा मतदारांची ओळख नीट पटवण्यासाठी देण्यात आलेल्या अनुदेशांचे पालन करण्याविषयी मतदान अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात. | ४.३.१ |
| १०. | दर दोन तासांनी, मतदान केंद्राध्यक्षाच्या नोंदवहीतील बाब १९ चे संकलन करण्यासाठी निवडणूक संबंधातील संख्यात्मक माहिती गोळा करावी आणि ती क्षेत्रीय अधिकाऱ्याद्वारे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला पाठवावी. | १.१४ |
| ११. | जर एखाद्या मतदाराला ईलेक्ट्रॉनिक मतदार यंत्रावर मतदान कसे करावे याची माहिती हवी असल्यास, बनावट (डमी) मतदान पत्राच्या सहाय्याने त्याला मतदानाची प्रक्रिया स्पष्ट करून सांगावी. | ... |

**मतदान केंद्राध्यक्षांसाठी तपासणी सूची—**चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| **(आय)** | **अनियमित आणि गुंतागुंतीची प्रकरणे** | |
| **१.** | **नियम-४९ एमए** व्हीव्हीपीएटी कागदी चिठ्ठ्यांवर छापण्यात आलेल्या मजकुरासंबंधातील तक्रारी बाबतची कार्यपद्धती (चुकीचे मुद्रण)— | ५.९ |
| | (एक) आरोप करण्यात आल्यावर, त्या मतदाराकडून लेखी प्रतिज्ञापन **(परिशिष्ट-१७)** घ्यावे. मतदारास खोट्या प्रतिज्ञापन करण्याच्या परिणामांबाबत माहिती द्या. | ५.९.२ |
| | (दोन) नमुना १७ ए मध्ये त्या मतदाराच्या संबंधातील, दुसरी नोंद करा आणि मतदाराला मतदार यंत्रामध्ये चाचणी मताची नोंद करण्याची परवानगी द्या. | ५.९.३ |
| | (तीन) पण जर का आरोप चुकीचा असल्याचे आढळून आल्यास, अशा चाचणी मतासंबंधीतील नोंद नमुना १७ सी च्या भाग 'आय' मधील बाब ५ मध्ये आवश्यक नोंद घ्या. | ५.९.३ |
| **२.** | **अंध आणि विकलांग मतदारांकडून मतदान** | |
| | नियम ४९-एन अन्वये, अशा अंध किंवा विकलांग मतदारांना, ज्याचे वय १८ वर्षांपेक्षा कमी नसेल अशा एखाद्या सोबत्यास बरोबर घेण्याची तिला/त्याला परवानगी द्या. सोबत्याकडून परिशिष्ट १८ मधील प्रतिज्ञापन घ्यावे आणि अशा सर्व प्रकरणांची नोंदसुद्धा नमुना १४ए मध्ये ठेवावी. | ५.२ |
| **३.** | **मतदान न करण्याचे ठरविलेले मतदार** | |
| | मतदान नोंदवहीमध्ये मतदारासंबंधीच्या नोंदी समोरील शेऱ्याच्या स्तंभात नोंद घ्यावी, आणि नियम ४९ओ अन्वये मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठ्याचा ठसा घ्यावा. | ५.३ |
| ४. | **प्रदत्त मते** | |
| | **(एक)** प्रदत्त मतपत्रिका मतदाराला सुपूर्द करण्यापूर्वी, त्या मतपत्रिकेच्या मागच्या बाजूस 'प्रदत्त मतपत्रिका' असे शब्द आपण लिहावेत. नमुना १७बी मध्ये मतदाराची सही घ्यावी. | ५.६ |
| | **(दोन)** (एक) प्रदत्त मतपत्रिका म्हणून वापरण्यासाठी दिलेल्या, (दोन) मतदारांना देण्यात आलेल्या आणि (तीन) न वापरता परत केलेल्या मतपत्रिका, अशा सर्व मतपत्रिकांचा अचूक हिशेब नमुना १७-सीच्या भाग एकच्या बाब क्रमांक ९ मध्ये ठेवावा. | ५.६ |
| | **(तीन)** ज्या मतदारांना प्रदत्त मतपत्रिका देण्यात आल्या आहेत अशा मतदारांची संपूर्ण नोंद ठेवावी. | ५.६ |
| | **(चार)** मतदान केलेल्या सर्व प्रदत्त मतपत्रिका आणि अशा प्रदत्त मतपत्रिकांची यादी, खास त्या हेतूने पुरविण्यात आलेल्या लिफाफ्यात ठेवाव्यात आणि मतदान संपल्यावर तो लिफाफा मोहोरबंद करावा. | ५.६.४ |
| **(जे)** | **मतदान समाप्त करणे** | |
| १. | मतदान जरी उशिरा सुरू करण्यात आलेले असेल तरी नेमून दिलेल्या वेळेतच समाप्त करण्यात यावे. त्यावेळी रांगेत उभे असतील अशाच व्यक्तींना मतदान केंद्राध्यक्षाच्या सहीच्या चिठ्ठ्या द्याव्यात. | ७.१.२ |

**मतदान केंद्राध्यक्षांसाठी तपासणी सूची—**चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| २. | नेमून दिलेल्या तासानंतर कोणीही अतिरिक्त व्यक्ती रांगेत सामील झाली नाही याची खात्री करावी. | ७.१.२ |
| ३. | वरील प्रक्रियेनुसार शेवटच्या मतदाराने आपले मत नोंदविल्यानंतर, नियंत्रण युनिटावरील 'क्लोज' बटण दाबल्याची आणि मतदान केंद्राध्यक्षाच्या अहवालातील भाग-तीन तयार करण्यात आल्याची खात्री करावी. | ७.२ |
| ४. | नमुना १७सी च्या भाग-एक च्या बाब क्रमांक ६ मध्ये ईव्हीएम यंत्रात नोंदवल्या गेलेल्या ... एकूण मतांची नोंद घ्यावी. | ७.२.२ |
| ५. | मतदान समाप्त होण्याच्या वेळी, मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीमध्ये, नियंत्रण युनिट वर प्रदर्शित झालेला मतदान संपल्याचा दिनांक व वेळ नमूद करावा. | ७.२.५ |
| ६. | नियंत्रण युनिट बंद (स्वीच ऑफ) करावे आणि मतदान युनिट (युनिटों) व्हीव्हीपीएटी पासून आणि नियंत्रण युनिटापासून व्हीव्हीपीएटी यांचा संपर्क खंडीत करा. | ... |
| ७. | वहनपेटीत मध्ये मोहोरबंद करण्यापूर्वी व्हीव्हीपीएटी ऊर्जासंच (पॉवर पॅक) काढून टाका. ... | ७.४ |
| **(के)** | **नोंदविलेल्या मतांचा हिशेब :** | |
| १. | मतदान समाप्त झाल्यानंतर, नियम-४९ एस अनुसार, मतदान यंत्रामध्ये नोंदविलेल्या मतांचा हिशेब तयार करावा (असा हिशेब नमुना १७सी च्या भाग-एक मध्ये तयार करण्यात यावा. तो दोन प्रतीत तयार करण्यात यावा.) | ७.३.१ |
| २. | नियम-४९ एस अन्वये, मतदान समाप्त होण्याच्या वेळी, सर्व उपस्थित मतदान प्रतिनिधींना, नमुना १७सी मध्ये तयार केलेल्या नोंदलेल्या मतांच्या हिशेबाची एक सत्य व प्रमाणित केलेली प्रत, पोचपावती घेतल्यानंतर देण्यात यावी. | ७.३.२ |
| ३. | मतदान समाप्तीच्या वेळी प्रतिज्ञापन करावे (भाग-तीन, परिशष्ट -६) ... ... | ७.३.३ |
| **(एल)** | **मतदान समाप्त झाल्यानंतर (ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र) ईव्हीएम आणि मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी (व्हीव्हीपीएटी) व इतर दस्तऐवज मोहोरबंद (सील) करणे.** | |
| १. | मतदान युनिट (मतदान युनिटे) नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपीएटी ची जोडणी (connection) खंडीत करण्यापूर्वी नियंत्रण युनिटमधील पॉवर स्वीच बंद (स्वीच ऑफ) करा. | ७.४.२ |
| २. | व्हीव्हीपीएटीची ऊर्जा संच (पॉवर पॅक) काढून टाकला आहे, व्हीव्हीपीएटीच्या ड्रॉप बॉक्स मध्ये असलेल्या कागदी चिठ्ठ्या शाबूत असल्याची आणि मतदान युनिट (युनिटे), नियंत्रण युनिट व व्हीव्हीपीएटी अनुक्रमे त्या त्या वहन पेट्यांमध्ये ठेवण्यात आली असल्याची खातरजमा करा. | ७.४.२ |
| ३. | वहन पेट्यांच्या दोन्ही बाजूस मोहोरबंद करण्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या दोन छिद्रांतून धागा ओवून आणि त्या मोहोरबंद करावयाच्या धाग्यातून निवडणूक, मतदान केंद्र आणि त्यात (वहनपेटीत) असलेली युनिटे यांचा तपशील व मतदान केंद्राध्यक्षाची तारखेसह सही आणि मोहोर असलेली पत्ता खुणचिठ्ठी (Address Tag) घालून, प्रत्येक वहनपेटी (carring case) दोन्ही बाजूने मोहोरबंद केल्याची खात्री करा. | ७.४.३ |

**मतदान केंद्राध्यक्षांसाठी तपासणी सूची**—समाप्त

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ४. | मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या आणि आपली स्वतःची मोहोर लावू इच्छिणाऱ्या उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींना सुद्धा तसे करण्याची परवानगी देण्यात येईल याची खात्री करावी. | ७.४.४ |
| ५. | ज्या उमेदवारांनी/मतदार प्रतिनिधींनी नियंत्रण युनिट व मतदान युनिट (युनिटे) यांच्या वहन पेट्यांवरील खूणचिठ्ठीवर आपली मोहोर लावली आहे अश्यांची नावे मतदान समाप्तीच्या वेळी करावयाच्या प्रतिज्ञापनामध्ये नोंदविण्यात आल्याची खात्री करावी. | ७.४.५ |
| ६. | नियम ४९-यू च्या तरतुदींनुसार मतदानाशी संबंधित सर्व निवडणुकविषयक कागदपत्रे मोहोरबंद केल्याची खात्री करा. | ७.५.१ |
| ७. | निवडणुक विषयक कागदपत्रे ठेवण्यात आलेले प्रत्येक पाकीट अद्ययावत सूचनांच्या अनुसार बंद केले आहेत याची खात्री करावी. | ७.५.२ |
| ८. | मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या उमेदवारांना अथवा त्यांच्या प्रतिनिधींना, ते इच्छुक असल्यास, अशा पाकीटावर त्यांच्या मोहोरा लावण्याची अनुमती दिली असल्याची सुनिश्चिती करावी. | ७.५.१ |

भारत निवडणूक आयोग

**Election Commission of India**

निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१